

संस्कृत साहित्य सरिता

मध्यमव्यायोग

संस्कृत साहित्य सरिता : २८

भास-कृत

मध्यमव्यायोग

कथासार
अमरेन्द्र

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करींत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

परिचय

'मध्यमव्यायोग' या भासाच्या नाटकाला महाभारताच्या आदिपर्वांमधील बक-वधपर्वांतील कथानकाचा आधार आहे. महाभारतांतील कथानकांवर भासानें वेगवेगळीं एकूण सहा नाटकें लिहिलीं. त्यांपैकीं हें एक आहे. भीमाची वनवासांतील पत्नी हिडिंबा राक्षसी व तिच्यापासून झालेला त्याचा मुलगा घटोत्कच यांची भीमाशीं अकल्पित रीतीनें गांठ पडली असें यांत दाखविलें आहे.

'मध्यमव्यायोग' हें नांव या नाटकाला दिलेलें आहे, तें सार्थ आहे. राक्षसाच्या तावडींत सांपडलेल्या ब्राह्मणाचा मधला मुलगा शेवटीं राक्षसाकडे बळी म्हणून जाण्यास तयार झाला. त्या मधल्याचें नांव 'मध्यम' असें होतें. त्याला वांचविणारा भीम हाहि मधला पांडव म्हणून त्याला 'मध्यम' पांडवच म्हणत. आणि 'व्यायोग' हा प्राचीन नाट्यकृतीचा एक विशिष्ट प्रकार आहे. त्यावरूनच याला 'मध्यमव्यायोग' हें नांव भासानें दिलेलें दिसतें.

भासाच्या प्रत्येकच नाटकांत संभाषणाची खुमारी आहे; 'मध्यमव्यायोगां'तील संवाद तर या दृष्टीनें खरोखरी अप्रतिम आहेत. आपण एकादें आधुनिक नाटक वाचतों आहोंत कीं काय, असा कित्येकदां तें वाचतांना भास होतो.

—लेखक

मध्यमव्यायोग

वाट घनदाट अरण्यांतली होती. काळोखाच्या भिंती उभ्या कराव्या तशा निसर्गानें उंचच उंच पर्वतांच्या रांगा त्या अरण्यासभोंवार उभारलेल्या दिसत होत्या. झाडी इतकी दाट होती कीं वरचें आकाश किंवा आजूबाजूचा प्रदेशहि कांहीं दिसूं शकत नव्हता. वन्य पशु–पक्ष्यांनीं गजबजलेलें तें हिडिंबावन ऋषिमुनींनाच राहाण्याच्या योग्य-तेचें होतें.

परंतु केशवदास ब्राह्मणाला आज त्या अरण्यांतूनच वाट काढीत जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. कुरुक्षेत्रांतील युप गांवचा राहाणारा हा ब्राह्मण आपल्या मामाकडे मुंजीसाठीं निघाला होता. त्याचा हा मामा तेथून उत्तरेच्या बाजूला उद्यामक नांवाच्या खेड्यांत राहात होता. त्या गरीब ब्राह्मणाबरोबर त्याची बायको आणि तीन मुलगेहि होते. केशवदास स्वतः म्हातारा होता, मुलगे लहान होते आणि बायको तर बोलून चालून अबलाच. त्या अरण्यांत मनुष्य-

वस्ती नव्हती; उलट प्रवासाला निघतांना जलक्लिन्न मुनींनीं त्यांना अगोदरच सावध करावें म्हणून सांगितलें होतें कीं, त्या अरण्यांत राक्षसांची वस्ती आहे तेव्हां जपून. त्यामुळें भीतभीतच तें ब्राह्मण कुटुंब वाटचाल करीत होतें.

इतक्यांत ज्या संकटाची त्यांना धास्ती वाटत होती तेंच प्रत्यक्ष त्यांच्यासमोर येऊन ठेपलें. साऱ्या जगाचा संहार करावयास सज्ज झालेल्या युगप्रलयकारी शंकराप्रमाणें भयंकर भासणारा व अंधाराच्या पुंजक्याप्रमाणें काळाकभिन्न दिसणारा एक पुरुष त्यांची वाट अडवून उभा राहिला. त्याच्या वटारलेल्या बटबटीत डोळ्यांत तांबड्या लाल ज्वाला उफाळत होत्या. त्यानें गळ्यांत घातलेला अलंकार पाहून तर विजेसह असलेला ढग दिसावा तसा तो वाटत होता. त्याचे तांबुस सोनेरी केंस पिंजारलेले होते आणि डोळे ताऱ्यांप्रमाणें चकाकत होते. त्याच्या अंगावर पिवळसर लोंकरी वस्त्र होतें. त्याचें पुढें आलेलें दंताड लहानशा हत्तीच्या दांताप्रमाणें दिसत होतें, तर नाक म्हणजे एक मोठा थोरला नांगराचा फाळच वाटत होता. त्याचे हात म्हणजे जणूं पोसलेल्या हत्तींच्या सोंडांसारखे भासत होते.

तो वृद्ध ब्राह्मण विचारांत पडला कीं, हा कोण असावा. थोरला व मधला असे दोघे मुलगे त्याच्याकडे कुतूहलानें पाहूं लागले. धाकटा घाबरून हा कोण आपल्याला त्रास देत आहे, म्हणून विचारूं लागला. बायकोनेंहि तोच प्रश्न केला. प्रचंड पर्वतावर विजेचा लोळ येऊन कोसळावा, पक्ष्यांच्या थव्यावर ससाण्यानें झडप घालावी किंवा हरणांच्या कळपावर सिंहानें झेंप घ्यावी तसा साक्षात मृत्यूच आपल्यासमोर येऊन उभा राहिला आहे कीं काय असें त्यांना वाटूं लागलें. तीं सगळीं भीतीनें अगदीं गर्भगळित होऊन गेलीं.

इतक्यांत त्या भयंकर पुरुषानेंच त्या ब्राह्मणाला हांक मारून म्हटलें, " ब्राह्मणा, थांब, तिथेच थांब. आपल्या घाबरलेल्या बायकापोरांचें रक्षण करायची ताकद तुझ्यांत नाहीं. माझ्या भीतीनें तुझा सारा धीर खचलेला दिसतो. गरुडानें पंख फडफडावल्यामुळें त्रासलेल्या सापासारखी तुझी स्थिति झाली आहे. तरीपण हें ब्राह्मणा, तूं पुढें जाऊं नकोस, थांब. "

घाबरलेल्या म्हाताऱ्याला त्या राक्षसाचे ते शब्द ऐकून थोडा धीर आला. 'हा अगदींच कांहीं उलटच्या काळजाचा

राक्षस दिसत नाहीं. कांहीं विवेक, विचार दिसतो आहे याला, ' असें त्या ब्राह्मणाला वाटलें आणि त्यामुळें त्यानें आपल्या बायकोला व मुलांनाहि धीर दिला.

त्या म्हाताऱ्या ब्राह्मणाला वाटलें तें कांहीं खोटें नव्हतें. ब्राह्मण हे सदासर्वकाळ आदरणीय आहेत, आपण त्यांच्याशीं वाईट रीतीनें वागूं नये, याची जाणीव त्या राक्षसाला होती. आणि म्हणूनच तो त्या म्हाताऱ्याशीं इतक्या गोडीनें बोलला. परंतु, हें खरें असलें तरी त्या राक्षसाला त्या ब्राह्मण कुटुंबाला तसेंच पुढें जाऊं देणेंहि शक्य नव्हतें. कारण त्याच्या आईचा उपास त्या दिवशीं सुटावयाचा होता आणि पारण्यासाठीं तिला कांहीं तरी असें भक्ष्य पाहिजेच होतें. अर्थात मुलाच्या नात्यानें वाटेल त्या उपायानें आईचें काम पार पाडणें हें त्या राक्षसाचेंहि कामच होतें. त्यामुळें तो त्या कुटुंबाजवळ येऊन पोहोंचला.

बिचारा ब्राह्मण स्वस्थ उभा होता. आपल्या हातून या क्रूरकर्म्याचें कांहीं निवारण होण्यासारखें नाहीं, हें तो कधींच समजून चुकला होता. समोर दिसणारा हा काळ-पुरुष एक नरभक्षक राक्षस आहे या जाणिवेनेंच खरें म्हणजे तो सुन्न होऊन गेला होता. तेव्हां ब्राह्मणीनें, कोणी

त्या राक्षसाला अडविण्यासाठीं कांहींच करीत नाहीं असें पाहून ' कोणाला मदतीसाठीं बोलवा तरी ' म्हणून नवऱ्याला सुचविलें. पण त्या निर्जन, निबिड अरण्यांत हांक मारणार तरी कोणाला! तपस्वी लोकांना एकान्तामुळें आवडण्यासारख्या त्या प्रदेशांत यांची सोडवणूक करण्यासारखा बलवान असणार तरी कोण! परंतु तेवढ्यांत त्या म्हाताऱ्याला आठवलें कीं वनवासांत असलेले पांडव तेथून जवळपासच कोठेंतरी राहात असले पाहिजेत.

आश्रयाला आलेल्याचें रक्षण करणें हें तर पांडवांचें ब्रीद. लढाईला त्यांची कधींच ना नसायची. गरिबांचे कनवाळू व साहसी पांडव या राक्षसासारख्या दुष्टांना शिक्षा करण्यास पूर्ण समर्थ होते. अर्थातच पांडवांचा आश्रम खरोखरीच तेथें आसपास असेल तर त्यांच्याकडे मदतीसाठीं धांव घ्यावी असें साहजिकच त्या म्हाताऱ्याच्या मनांत आलें. पांडवांचा आश्रम जवळपास असावा ही त्याची कल्पनाहि कांहीं चुकीची नव्हती. परंतु दुर्दैवानें नेमके त्याच सुमारास पांडव तेथून धौम्य ऋषींच्या आश्रमांत गेलेले होते. धौम्यांनीं शतकुंभ नांवाचा यज्ञ आरंभिला होता त्यासाठीं त्यांना बोलावणें होतें. ही माहिती थोरल्या

मुलाच्या तोंडून म्हाताऱ्याला समजली व तो ' आतां सर्व संपलेंच ' अशा भावनेनें मटकन खालीं बसला. पण थोरल्या मुलानें त्याला एक आशेचा किरण दाखविला. तो म्हणाला, " पण बाबा, सर्वचजण कांहीं तिकडे गेलेले नाहींत. मध्यम पांडवाला–मधल्या भावाला आश्रमाची राखण करावयाला ठेवून गेले आहेत ते. " तेव्हां पुन्हां ब्राह्मणाला हुरूप आला. तो उद्गारला, "–तर मग, सगळे पांडव असल्यासारखेच आहेत ! " पण ही मध्यम पांडवाची म्हणजे भीमाची स्वारीसुद्धां व्यायाम घेण्यासाठीं नेमकी त्याच वेळीं कोठेंतरी दूरवर गेली होती असें समजलें. मग मात्र त्या म्हाताऱ्यानें सर्व आशा सोडली आणि शेवटचा उपाय म्हणून त्या राक्षसाचीच मनधरणी तो करूं लागला. कारण नुसतें हात जोडून स्वस्थ बसण्यापेक्षां असें तोंड हालवून तरी कांहीं उपयोग झाला तर पाहावा हीच त्याची कल्पना होती. म्हणून त्यानें त्या राक्षसालाच विचारलें, " बाबारे, आमची सुटका होण्याचा कांहीं मार्ग सांगतोस का ? "

त्या ब्राह्मण कुटुंबाला सुटकेसाठीं म्हणून राक्षसानें एक अट सांगितली–त्यांतील एका मुलानें त्याच्या स्वाधीन व्हावें. तो शांतपणानें म्हणाला, " ब्राह्मणा ! हें पाहा,

माझ्या आईचें आहे आज उपासाचें पारणें. त्याकरितां तिनें, मला या अरण्यांतून एकादा माणूस पकडून आणण्यास सांगितलें आहे. आणि तुम्ही माझ्या हातीं सांपडलां आहांत. तरीपण तुमची सुटका व्हावी असें वाटत असेल तर तुझ्या तीन मुलांतला एक मुलगा तूं मुकाटयानें माझ्या स्वाधीन कर. मग गुणावगुणांच्या दृष्टीनें त्यांतला कोठला द्यावयाचा तें तूंच ठरव हवें तर."

तेव्हां मात्र तो सात्त्विक ब्राह्मण उसळला. त्याचीं सर्वच मुलें सद्‌गुणी व सुशील होतीं. असा स्वतःचा, एक कां होईना, मुलगा त्या नरभक्षकाच्या स्वाधीन करून त्या ब्राह्मणाला मनःस्वास्थ्य कोठून लाभायला ! अर्थांतच त्यानें राक्षसाचें हें मागणें झिडकारून टाकलें. परंतु राक्षस कांहीं एवढयावर स्वस्थ बसण्यासारखा नव्हता. त्यानें मग सरळच सांगून टाकलें कीं, " मी विनवून सांगत असतांनाहि जर एवढें करायलाहि तूं तयार नसशील तर मात्र तुझ्या साऱ्या कुटुंबासकट तुझीं शंभर वर्षें भरायला क्षणाचाहि उसंत लागणार नाहीं हें लक्षांत ठेव."

परंतु ब्राह्मणाचा निश्चय अढळ होता. तो म्हणाला, "माझ्या मुलाच्या रक्षणासाठीं या राक्षसरूपी अग्नींत

माझ्या स्वतःच्या शरीराची आहुति टाकावयाला मी तयार आहे. तसें माझें आतां काय राहिलें आहे ! हें शरीर तर म्हातारपणामुळें थकलेंच. विधिसंस्कारांनीं तें पुनीतहि झालेलें आहे. तेव्हां त्याचेंच हवन करून टाकतों म्हणजे झालें." परंतु पतिव्रता आर्य पत्नीला हें कसें बघवणार ! त्या ब्राह्मणाची वृद्ध पत्नी आपल्या पतीला अडवीत म्हणाली, " छेः छेः पतिव्रतेला पतीशिवाय जगांत दुसरा कशाचा आधार आहे ? म्हणून तुमच्या व कुटुंबाच्या रक्षणासाठीं माझेंच शरीर मी सार्थकीं लावतें. "

पतिव्रता पतीसाठीं आपले प्राण द्यावयाला तयार झाली खरी, पण राक्षसाच्या आईला पारण्यासाठीं स्त्री चालण्यासारखी नव्हती. तेव्हां म्हाताऱ्यानें पुन्हां त्याच्याबरोबर येण्याची तयारी दर्शविली. परंतु तें म्हातारें सुकलेलें खोड कुठून पसंत पडायला त्या राक्षसाला ! त्यानें त्या म्हाताऱ्यालाहि बाजूला सारलें. तेव्हां मग थोरला मुलगा पुढें झाला आणि आपल्या वृद्ध मातापित्यांच्या व कुटुंबाच्या रक्षणासाठीं स्वतःच्या प्राणांचें मोल त्यानें देऊं केलें. परंतु तो होता थोरला मुलगा. कुटुंबांत आणि बाहेर लोकांतहि त्याचा पहिला मान. आईबापांचें प्रेमहि त्याच्यावर अधिक. हेंच कारण सांगून मधल्या

मुलानें म्हटलें कीं, "दादा, मी एकटाच जातों या राक्षसाकडे. तूं आपलें तुझ्या वडील भावाच्या कर्तव्याकडे लक्ष दे." त्यावर सर्वांत धाकटा मुलगा होता तो म्हणाला, "वडील मंडळींचें प्राणरक्षण करण्याचें काम खरोखरी माझेंच आहे. थोरला भाऊ वडिलांसारखाच असल्याचें ब्रह्मवादी ज्ञात्यांनींच सांगितलेलें आहे."

"अरे पण, वडील संकटांत सांपडले तर त्यांच्या रक्षणाची जोखीमहि थोरल्या मुलावरच असते," थोरला त्याला अडवीत बोलला. "म्हणून वडिलांना वांचविण्यासाठीं मीच या राक्षसाकडे जाणें इष्ट आहे." तेवढ्यांत त्या म्हाताऱ्या ब्राह्मणानें सांगून टाकलें, "थोरला तर माझा जीव कीं प्राण! मी त्याला जाऊं देणार नाहीं."

"आणि धाकटा तितकाच माझा आवडता आहे," ब्राह्मणी म्हणाली.

उरला मध्यम; तो बिचारा कोणाला आवडणार? तेव्हां राक्षसानें त्या संधीचा चटकन फायदा घेऊन मधल्याला म्हटलें, "तूं मला पसंत आहेस; लवकर चल कसा माझ्याबरोबर." मधला मुलगा आपलें हें भाग्यच समजला. स्वतःच्या प्राणाच्या मोबदल्यांत वडील माणसांचे प्राण

आपण वांचवूं शकत आहों याचेंच त्याला समाधान मिळत होतें. आपल्या नातलगांवरील प्रेमापेक्षां त्यांच्यासाठीं प्राणार्पण करण्याची मिळणारी संधी त्याला अधिक मोलाची वाटली. मधल्यानें तसें बोलून दाखवितांच राक्षसाचें काळीजहि भरून आलें.

मधला राक्षसाबरोबर जावयास तयार झाला. त्यानें वडिलांना नम्रपणानें नमस्कार केला. त्यांनीं त्याला आशीर्वाद दिला कीं, वडील मंडळींसाठीं स्वतःच्या प्राणाचें बलिदान ज्याअर्थीं तूं करीत आहेस त्याअर्थीं तूं ब्रह्म-लोकाला जाशील. नंतर मधल्यानें आपल्या आईला नमस्कार करून तिचाहि आशीर्वाद घेतला. मग त्यानें आपल्या थोरल्या भावाला नमस्कार केला. त्यानें आपल्या सद्‌गुणी भावाला म्हटलें कीं, तुझी कीर्ती साऱ्या जगभर पसरो. सर्वांत शेवटीं धाकट्यानें मधल्याला कृतज्ञतापूर्वक नमस्कार करून त्याचा आशीर्वाद घेतला.

तेथून निघण्यापूर्वीं मधल्यानें राक्षसाला विनंती केली कीं जवळच असलेल्या तळ्यावर जाऊन मला थोडें पाणी पिऊन घेऊं दे. राक्षसाला खरें म्हणजे फार घाई होती. त्याच्या आईच्या पारण्याची वेळ टळून चालली होती.

तरीपण त्या मुलाच्या निर्धाराबद्दल राक्षसाची खात्री झाली असल्यामुळें त्यानें त्याला तशी परवानगी दिली. मात्र लवकर परत येण्याबद्दल बजावलें. मधला मुलगा वडिलांचा निरोप घेऊन तेथून तळ्याकडे निघून गेला. तो खरोखरीच गेल्यावर मात्र बापाच्या अंतःकरणाचा बांध फुटला. एखाद्या बलाढ्य हत्तीनें एकादें फुलतें झाड खालीं पाडावें तसा त्याचा मुलगा त्या राक्षसाच्या हातून नाश पावत होता. त्याचे तीन मुलगे तीन शिखरें असलेल्या पर्वताप्रमाणें होते; त्यांतलें मधलें शिखर अशा रीतीनें कोसळून पडतांना पाहून त्याला अतिशय दुःख झालें. तो कळवळून म्हणत होता, "बाळा तूं खरेंच कीं रे गेलास!" बापाचा मुलासाठीं असा शोक चालला होता तर राक्षसाला त्याला घेऊन जाण्याची घाई सुटली होती. मुलगा तर लवकर परत येतांना दिसत नव्हता. तेव्हां राक्षसानें एक शक्कल काढली. त्यानें त्या म्हाताऱ्यालाच म्हटलें कीं, अहो, तुम्ही आपल्या मुलाला हांक मारा पाहूं.

पण अशी हांक मारणें म्हणजे त्याच्या मृत्यूलाच बोलावण्यासारखें होतें. राक्षसाला त्यांत भयंकर असें कांहींच वाटत नसलें तरी त्या म्हाताऱ्या ब्राह्मणाच्या काळजाला त्यानें घरे पडत होते. त्यामुळें त्याला ती कल्पना फारच

भयंकर व क्रूरपणाची वाटली. अर्थातच त्यानें चिडून राक्षसाचें म्हणणें नाकारलें आणि म्हटलें कीं, "हें राक्षसालाहि शोभत नाहीं!" तेव्हां राक्षसाच्या लक्षांत आपली चूक आली. तो म्हणाला, "बाबा, शांत व्हा. माझ्या स्वभावामुळें माझ्या हातून ही चूक घडली खरी. तुम्ही नका हांक मारूं, पण मला त्याचें नांव तरी सांगाल?" रागावलेल्या म्हाताऱ्यानें त्यालाहि नकार दिला. मग राक्षसानें थोरल्या मुलाकडून काढून घेतलें कीं, तळचावर गेलेल्या मधल्या मुलाचें नांव 'मध्यम' असें आहे. राक्षसाला मधल्या मुलाचें 'मध्यम' हें नांव बरोबरहि वाटलें. लगेच त्यानें स्वतःच "मध्यमा, मध्यमा, लवकर ये" म्हणून हांका मारायचा सपाटा लावला.

ब्राह्मणाच्या मधल्या मुलाला आतां या जगांतूनच जायचें होतें त्यामुळें त्याला घाई नव्हती. अखेरचें पाणी पिऊन घ्यावें म्हणून त्याचें पाणी पिणें सावकाशपणें चाललें होतें. त्याच्या कानापर्यंत राक्षसाची हांक गेलीहि नसावी. परंतु 'मध्यमा', 'मध्यमा' या हांकांनीं दुसरा एक माणूस मात्र बुचकळ्यांत पडला. तो होता भीम–मधला पांडव. त्यालाहि 'मध्यम' म्हणत असत. त्यामुळें अर्जुनासारख्या आवाजानें आपल्याला मोठमोठ्यानें या जंगलांत कोण हांका

मारीत आहे त्याला कांहीं कळेना. त्याला त्याचें मोठें कुतूहल वाटलें.

भीमाची स्वारी त्या किर्र् जंगलांत चांगला ऐसपैस व्यायाम घेत होती. त्याच्या व्यायामांत या हांकांनीं अड-थळा आला. इकडे राक्षस अधीर होऊन सारखा 'मध्यमा' 'मध्यमा' म्हणून अधिकाधिक मोठ्यानें हांका मारीतच होता. त्या आवाजानें सारें रान दणाणून गेलें होतें. अखेर भीमाला कांहीं राहावलें नाहीं. तो जागचा उठून इकडे तिकडे पाहूं लागला कीं हांक तरी कोण मारतें आहे. तोंच एकाद्या जातिवंत हत्तीच्या ऐटींत उभा असलेला तो भीमकाय राक्षस त्याच्या दृष्टीला पडला. त्याच्याकडे पाहिल्याबरोबर भीमाच्याहि डोळ्यांचें पारणें फिटलें.

त्या सिंहमुखी पुरुषाचे डोळे दारुसारखे चमचम करीत होते. त्याची पुष्ट मान, हत्तीसारखी हनुवटी, फुगलेली छाती, रुंद खांदे आणि लांब हात पाहून भीमानें अंदाज केला कीं हा कोणातरी असामान्य वीरश्रेष्ठाचा एकाद्या राक्षसीपासून झालेला मुलगा असला पाहिजे.

राक्षसाचें 'मध्यमा'ला हांक मारणें चालूच होतें. तेव्हां भीम स्वतःच पुढें होऊन म्हणाला, "मी आलों आहे

कीं !" त्यामुळें राक्षसाचें लक्ष साहजिकच भीमाकडे गेलें. बोलून चालून भीमच तो. त्याचे सगळे अवयव सिंहाशीं स्पर्धा करीत होते. राक्षस विचार करूं लागला कीं, हा कमलनयन व गरुडवाहन विष्णु तर नव्हे ? आपल्या नात्यांतल्या माणसाला पाहातांच जशी त्याची ओढ वाटावी तशी भीमाला पाहून त्या राक्षसाला त्याच्याविषयीं एक प्रकारची ओढ वाटूं लागली.–तरीपण ब्राह्मणाच्या 'मध्यम' मुलाला हांका मारण्याचें त्याचें काम चालूच होतें. तो म्हणत होता, " अरे मध्यमा, मी तुला बोलावतों आहें. "

" आणि म्हणून तर मी आलों आहें, " भीमानें त्याच्या जवळ येऊन पुन्हां सांगितलें.

" तूंहि मध्यम आहेस काय ? " राक्षसानें विचारलें.

" दुसरा कोण ? मीच तो, " भीमानें उत्तर दिलें. " अजेय व अहंकारी लोकांत, तसेंच पृथ्वीवर व माझ्या भावांतहि मी मधला आहें. पंचमहाभूतांत आणि राजेलोकांतहि मधला असून वयानेंहि मी मध्यमच आहें. सर्व कार्यांत मी मध्यम म्हणूनच समजला जातों. "

राक्षसाला तेथें अकस्मात उपटलेल्या त्या अनोळखी पुरुषाच्या या बडबडीचा कांहीं अर्थच समजेना. त्या

म्हाताऱ्या ब्राह्मणाला मात्र त्याच्या 'मध्यम' 'मध्यम' या वारंवार आलेल्या शब्दांवरून हा पांडवांतला मध्यम-मधला भाऊ भीम असावा अशी शंका आली. राक्षसाचा उद्धट-पणा सहन न झाल्यामुळें त्याचा समाचार घेऊन आपली सुटका करण्याकरितांच हा येथें आला आहे कीं काय असेंहि त्याला वाटूं लागलें.

इतक्यांत ब्राह्मणाचा मधला मुलगा तळ्यावरून पाणी पिऊन परत आला. तो राक्षसापाशीं येऊन म्हणाला, " हा मी आलों. " राक्षसहि लगेच त्याला घेऊन जाऊं लागला. परंतु ब्राह्मण घाईघाईनें त्या नवीन आलेल्या ' मध्यमा '-पाशीं जाऊन काकुळतीनें विनवूं लागला, " मध्यमा, या ब्राह्मण कुटुंबाला जीवदान दे. " भीमानें त्याला नमस्कार करून घाबरूं नको म्हणून सांगितलें आणि त्याच्या भीतीचें कारण काय म्हणून विचारलें.

तेव्हां केशवदासानें भीमाला आपली हकीकत सांगितली. तो म्हणाला, " माझें नांव केशवदास असून मी माठर गोत्री ब्राह्मण कल्पशाखेचा अध्वर्यु आहें. कुरूराज युधि-ष्ठिर पूर्वीं राहात असे त्या कुरुक्षेत्रांतील युप गांवचा मी राहाणारा. माझा मामा काश्यपगोत्री यशबंधु येथून

उत्तरेला असलेल्या उद्यामक नांवाच्या गांवीं राहातो. त्याच्या मुलाची मुंज आहे म्हणून मी बायको-मुलांना घेऊन तिकडे चाललों होतों. तों या भयंकर अरण्यांत या राक्षसानें माझी वाट अडविली; आणि आपल्यासारख्यांच्या देखतहि माझ्या मुलाबाळांसह मला मारून टाकण्याचा याचा विचार आहे. ”

भीमसेनाच्या एकूण सगळा प्रकार ध्यानांत आला. तो तेथें उभा असतांना राक्षसाला असा अत्याचार कसा करूं देणार ! त्यानें राक्षसाला दटावून म्हटलें, “ थांब. ” राक्षसहि आपल्या शक्तीविषयीं आत्मविश्वास बाळगणाराच होता. तो लगेच थांबला. भीम त्याला सांगूं लागला, “ बाबारे, ब्राह्मण, मग तो केंवढाहि अपराधी का असेना, त्याला ठार मारतां कामा नये. मग हा तर वृद्ध ब्राह्मण आहे, यानें सगळा संसार-उद्योग सोडून दिलेला दिसतो. तेव्हां अशा ब्राह्मणाला त्याच्या बायकोमुलांसह ठार मारून टाकणें मुळींच बरोबर नाहीं. त्या सर्वांना तूं सोडून द्यावेंस हें बरें. ”

परंतु राक्षस कांहींहि ऐकायला तयार नव्हता. त्याच्या त्या ताठरपणामुळें भीमाला राग येण्याऐवजीं एक

प्रकारचें कौतुकच वाटलें. अर्जुनाचा मुलगा सौभद्र त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला. या राक्षसानें आपल्या भावाचेच गुण चोरले कीं काय असें क्षणभर त्याच्या मनांत आलें. हा तेजस्वी मुलगा कोणाचा असावा याचा तो विचार करूं लागला. परंतु त्या ब्राह्मणाची सुटका तर त्याच्या हातून व्हायलाच हवी होती. त्यामुळें भीमानें पुन्हां एकदां त्या राक्षसाला, त्या ब्राह्मण कुटुंबाच्या वाटेला न जातां त्याला सोडून देण्याबद्दल सांगून पाहिलें. तेव्हां जरा रागानें तो राक्षस उत्तरला, " त्याला मी मुळींच सोडणार नाहीं. मी त्याला माझ्या आईच्या आज्ञेवरून पकडलेलें आहे, त्यामुळें मला त्याला सोडतां येत नाहीं. इतकेंच काय पण प्रत्यक्ष माझ्या वडिलांनीं येऊनहि जरी ह्याला सोडून देण्याविषयीं आज्ञा केली तरी मी ती मानणार नाहीं ! "

राक्षसानें आईचें नांव काढतांच भीमाला मोठें नवल वाटलें. त्याच्या मातृभक्तीविषयीं कौतुक वाटलें. आईच्या आज्ञेंत राहात आल्यामुळेंच आपण आज या स्थितीला येऊन पोहोंचलों आहोंत, असें तो स्वतःहि मानीत होता. माता हीच मानवांचें श्रेष्ठ दैवत,हें तर तो पाहातच होता. त्यामुळें त्या कौतुकांत भरच पडली. भीमानें शेवटीं त्यालाच विचारायचें ठरविलें. " बरें पण, तुझी आई आहे तरी

कोण ? " या भीमाच्या प्रश्नाला उत्तर आलें, " हिडिंबा नांवाची राक्षसी ती माझी आई. कुरुकुलदीपक थोर पांडवाची ती पत्नी आहे. "

" तरीच ! हा हिडिम्बेचा मुलगा. मग याचा ताठरपणा अगदीं योग्य आहे. " भीम मनाशीं म्हणाला. त्या राक्षसाचा पाणीदारपणा त्याचें रूप आणि त्याचें सामर्थ्य हीं सारीं त्याच्या वाडवडिलांना शोभून दिसण्यासारखींच होतीं. तरीपण याच्या अंतःकरणांत माणसाबद्दलच्या कनवाळूपणाचा लवलेशहि कसा नाहीं, याचें भीमाला आश्चर्य वाटत होतें. यावेळींच भीमानें ओळखलें कीं हा आपला मुलगा घटोत्कच आहे; पण वरून मात्र त्यानें तसें दाखविलें नाहीं.

भीमानें पुन्हां एकदां घटोत्कचाला म्हणजेच राक्षसाला त्या ब्राह्मणाला सोडून देण्याबद्दल सांगितलें. परंतु तरीहि तो ऐकत नाहीं असें पाहून अखेर त्यानें ठरविलें कीं, आपणच याच्याबरोबर जाऊन पाहावें. त्यानें ब्राम्हणाला सांगितलें कीं, तूं आपल्या मुलाला घेऊन जा; मी या राक्षसाबरोबर जातों. परंतु मधल्या ब्राह्मणपुत्रानें त्याला अडविलें आणि म्हटलें, " छेः छेः, माझ्या आई-वडिलांना

वांचविण्याच्या उद्देशानें मी माझें जीवित कधींच अर्पण करून टाकलेलें आहे. आणि तुझ्यासारखा सद्‌गुणी व सुंदर मनुष्यच खरोखरी जगायला हवा. "

भीमाला त्या तरुण मुलाच्या दिलदारपणाचें मोठें कौतुक वाटलें. परंतु भीम स्वतः क्षत्रिय असल्यामुळें ब्राह्मणाचा जीव वांचवून त्यासाठीं आपले प्राण अर्पण करणें हें क्षत्रिय या नात्यानें त्याचें कर्तव्यच होतें. त्यामुळें त्यानें सांगितलें कीं, मी क्षत्रिय असल्यामुळें मीच याच्याबरोबर जातों.

हा नवीन आलेला पुरुष क्षत्रिय आहे हें त्याच्याच तोंडून समजल्यामुळें घटोत्कचाला त्याच्या प्रौढीचा अर्थ लक्षांत आला. मग मात्र त्यानें प्रथम त्या क्षत्रियाचाच समाचार घेण्याचें ठरविलें. तो मनाशीं म्हणाला कीं, ठीक आहे, प्रथम याचीच गठडी वळतों आणि मग या ब्राह्मण मुलाला घेऊन जातों आईच्या उपासाच्या पारण्यासाठीं !

घटोत्कचानें दरडावून म्हटलें, " कोण, कोण अडवतो या ब्राह्मणाच्या मुलाला ?"

" मी, " भीमानें तितक्याच जोरांत सांगितलें.

" चल तर, मग तूंच चल माझ्याबरोबर."

"पण तूं एवढा पराक्रमी! मी तुझ्याबरोबर कसें यावें ? ताकद असेल तर मला घेऊनच जा ना!" भीमाच्या या बोलण्यांतील उपहास त्या घटोत्कचाच्याहि लक्षांत यंण्यासारखा होता. त्यामुळें त्यानें उलट आढचतेनें विचारलें,

" मी कोण माहीत आहे का तुला ?"

" चांगलेंच! तूं तर माझा मुलगा." भीमानें हंसत म्हटलें. त्यानें खरें तेंच सांगितलें होतें. परंतु घटोत्कचाला तें कोठें माहीत होतें! त्यामुळें त्यानें संतापून विचारलें, " मुलगा ? मी तुझा मुलगा ?"

" अरे, असा रागावूं नकोस. मी क्षत्रिय पडलों, त्यामुळें साऱ्या प्रजेला पुत्राप्रमाणेंच मानतों आम्ही क्षत्रिय. म्हणून मी तुला मुलगा म्हटलें इतकेंच." भीमानें बाजू सांवरून घेतली.

" हें तर भ्याडाचें हत्यार उचललेंस!" घटोत्कचानें टोमणा मारला.

" भ्याडाचें ? मला भीति ही तर काय वस्तु आहे माहीतहि नाहीं बुवा! पण तुला जर त्यासंबंधीं कांहीं

माहीत असलें तर मला शिकव तरी! म्हणजे मी तसें वागण्याचा प्रयत्न करीन."

आतां मात्र भीमाकडून चाललेली ही हेटाळणी सहन करणें घटोत्कचाला शक्य नव्हतें. तेव्हां त्यानें भीमाला लढाईसाठीं ललकारून म्हटलें, "चल, हातीं शस्त्र घे, मग दाखवतों तुला भीति म्हणजे काय असते ती!"

पण भीमानें जिथे त्याची गंमतच करायची ठरवली. होती तिथे तो त्याला काय बधतो. त्यानेंहि तितक्याच जोरांत उत्तर दिलें, "काय शस्त्र घेऊं म्हणतोस? हें घेतलें."

पण भीमाच्या हातांत तर शस्त्र कोठेंच दिसेना. घटोत्कचानें त्याला तसें म्हटलें, तेव्हां भीमानें उत्तर केलें, "शत्रूचा फडशा पाडण्यांत सदा गुंतलेला माझा हा सोन्याच्या खांबासारखा उजवा हात हेंच माझें नैसर्गिक शस्त्र."

डोळे विस्फारून पण रागानें त्या माणसाकडे पाहात घटोत्कचानें त्याला तडकावलें, "हें म्हणणें केवळ माझे वडील भीमसेन यांनाच शोभून दिसतें!"

" भीम ? कोण हा भीम ?" भीमानें त्याला खिजवीत पुन्हां विचारलें, " जग निर्माण करणारा ब्रह्मा, शंकर, विष्णु, इंद्र कीं यम यांपैकीं कोणासारखे आहेत तुझे हे वडील ?"

" सगळ्यांच्यासारखे आहेत."

" छट्, गप्पा नको मारूंस उगीच. हें सगळें खोटें. "

आपल्या पित्याची या अनोळखी माणसानें आपल्यासमोर अशी उघडपणें हेटाळणी करावी हें त्या तेजस्वी राक्षसाला तरी कसें सहन होणार ! तेव्हां त्यानें जवळचेंच एक जाडजूड झाड उपटलें आणि दिला एक तडाखा ठेवून भीमाला. पण त्यानें भीम जागचा हाललासुद्धां नाहीं, मग त्या फटक्यानें त्याचें कांहीं बरें वाईट व्हायचें तर दूरच राहिलें. तेव्हां घटोत्कचानें तिथली एक प्रचंड शिळा उचलून रागानें भीमावर भिरकावली. पण हत्ती कितीहि रागावला तरी तो वाघाला थोडाच चीत करणार ! भीमानें त्या शिळेचे वरच्यावरच तुकडे करून टाकले.

घटोत्कच भीमाचा मुलगा आणि वायूचा नातू. त्यामुळें कुस्तींत तो कोणाला हार जाण्यासारखा नव्हता. म्हणून

जेव्हां त्यानें पाहिलें कीं आपला प्रतिस्पर्धी झाडाला किंवा शिळेलाहि दाद देत नाहीं, तेव्हां त्यानें भीमाला आव्हान देऊन त्याच्याशीं कुस्ती सुरू केली. पहिल्या सपाट्याला घटोत्कचानें भीमाला एक पेंच टाकून आपल्या वेंगेंत पकडलेंहि. भीमानें त्याच्या समाधानासाठीं त्याच्या कौशल्याचें कौतुकहि केलें. परंतु लगेच त्यानें उसळी घेऊन स्वतःची सुटका करून घेतली आणि आपल्या असामान्य शक्तीची चुणूक घटोत्कचाला दाखविली.

शारीरिक शक्तीचे सर्व उपाय हरले. हा पुरुष तर आपल्याला हार जात नाहीं. तेव्हां घटोत्कच विचार करूं लागला कीं आतां काय करावें. तोंच त्याला त्याच्या आईकडून मिळालेल्या 'मायापाशा'ची आठवण झाली. त्यानें पर्वताच्या झऱ्यांतून थोडें पाणी घेतलें आणि आचमन करून मंत्र म्हणतांच भीम त्या मायावी शक्तीच्या 'मायापाशां'त बांधला गेला. परंतु भीमाला त्यावरहि उपाय माहीत होता. त्याला शंकराकडून 'मायापाशां'तून सुटण्याचा मंत्र मिळालेला होता, त्याचा त्यानें उपयोग करावयाचें ठरविलें. त्यानें त्या ब्राम्हणाच्या मुलाकडून कमंडलूंतलें पाणी आणविलें आणि त्यानें आचमन करून मंत्र जपतांच त्याचा 'मायापाश' तुटून गेला.

आतां मात्र घटोत्कचाला आपली अब्रु बचावण्यासाठीं त्या पुरुषाला नुसती विनंती करण्यापलीकडे कांहींच साधन उरलें नाहीं. म्हणून त्यानें त्याला पूर्वी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. भीमानेंहि तें मान्य केलें व तो त्याच्या मागोमाग चालूं लागला. त्या म्हाताऱ्या ब्राम्हणाला तें पाहून वाईट वाटलें व पुढें काय होतें म्हणून पाहाण्यासाठीं तोहि आपल्या परिवारासह त्यांच्या मागोमाग निघाला.

आपल्या राहाण्याच्या जागेपाशीं येतांच भीमाला बाहेर उभा करून आपल्या आईला म्हणजे हिडिंबेला बातमी देण्यासाठीं म्हणून घटोत्कच आंत गेला. त्यानें सांगितलें, " तुला पुष्कळ दिवसांपासून खाण्यासाठीं मनुष्य पाहिजे होता ना तो आणला आहे आज. "

" कसा काय आहे तो माणूस ? " हिडिंबेनें विचारलें.

" आकारानें माणूस खरा पण पराक्रमानें मात्र नव्हे," घटोत्कचानें उत्तर दिलें.

मग हिडिंबेनें अधिक चौकशी करून, तो ब्राम्हण आहे का, म्हातारा कीं लहान मुलगा आहे, असे अनेक प्रश्न

विचारले. परंतु त्या सर्वच प्रश्नांना घटोत्कचानें ' नाहीं ' म्हणून उत्तर दिलें. त्यामुळें तिला मोठें कुतूहल वाटून असा माणूस आहे तरी कोण म्हणून पाहाण्यासाठीं ती स्वतःच बाहेर आली. पाहाते तों समोर भीमसेन, तिचा पति उभा. ती मुलाला म्हणाली, " अरे वेड्या, तूं कोणाला घेऊन आलास, कांहीं कल्पना आहे का ? अरे हें तर माझें व तुझेंहि दैवत. " आणि तिनें पुढें होऊन आपल्या पतीला नमस्कार केला. हिडिंबेनें त्याचें नातें घटोत्कचाला समजावून देऊन आपल्या वडिलांना नमस्कार करण्यास सांगितलें.

भीमसेनालाहि हिडिंबेची ओळख पटली. वनवासांत असतांना या हिडिंबादेवीनेंच स्वतःच्या प्रेमळपणाच्या वागणुकीनें आपल्याला सुख दिलें होतें त्याची आठवण भीमाला झाली. परंतु तिच्या सध्यांच्या या वर्तनाचें त्याला नवल वाटत होतें. त्यामुळें त्यानें तसा प्रश्न करतांच हिडिंबेनें कानांत त्याला आपलें रहस्य सांगितलें कीं,आपण जातीनें राक्षसी असलों तरी वर्तनानें मात्र तशा नाहींत.

घटोत्कचानें आईच्या सांगण्यावरून भीमाला वडील म्हणून नमस्कार केला. नमस्कार करतांना त्यानें स्वतःची

ओळख ‘ धृतराष्ट्रपुत्ररूपी वनाचा वणवा ’ असें केलें आणि आपल्या उद्धटपणाबद्दल त्यानें भीमाची क्षमाहि मागितली. परंतु भीमानें उलट त्याचा गौरव करून म्हटलें कीं, “ तुझ्या उद्धटपणाचा मला राग आला नाहीं, उलट त्यामुळें समाधान वाटलें. तूं म्हटल्याप्रमाणें धृतराष्ट्र-पुत्ररूपी वनाचा तूं खरोखरीच वणवा व्हावेंस अशीच आमची इच्छा आहे. ” नंतर त्यानें त्याला ‘ महापराक्रमी हो ’ असा आशीर्वाद दिला.

हें सर्व पाहात असलेल्या केशवदासाला आतां कळून चुकलें कीं तो राक्षस म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून प्रत्यक्ष भीमाचा मुलगा घटोत्कच आहे. घटोत्कचानें भीमाच्या सांगण्यावरून मग त्या वृद्ध ब्राह्मणालाहि नमस्कार केला. तेव्हां त्यानें आशीर्वाद दिला कीं, ‘ वडिलांसारखाच गुणी व कीर्तिमान हो. ’

केशवदास ब्राह्मणानें भीमालाहि आशीर्वाद दिला आणि त्यानें आपलें कुटुंब वांचविल्याबद्दल कृतज्ञताहि प्रकट केली. भीमानें त्याला जवळच असलेल्या आपल्या आश्रमांत येऊन पाहुणचार घेण्याची विनंती केली. परंतु केशवदासानें म्हटलें

कीं, जीवदान दिलेंस हाच केवढा तरी पाहुणचार झाला. म्हणून तो त्याचा निरोप घेऊन चालूं लागला; भीम घटोत्कच व हिडिंबा यांच्यासह त्याला आश्रमाच्या दारा-पर्यंत पोहोंचविण्यास गेला.

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. उरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

प्रत्येकीं किंमत ६ आणे

६ आणे

व्होरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

